|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University Jalgaon

NAAC Re-Accredited (4th Cycle)

## संलग्नता विभाग

जा.क्र.कबचौउमवि/५/ संलग्नीत महा.प्रस्ताव-२०२७-२८/२३०/२०२६ दि. ७/०९/२०२६

**अत्यंत महत्वाचे**

**परिपत्रक**

**विस्ताराचे (Extension) प्रस्ताव सादर करणेसाठी इच्छुक असलेल्या विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांचेकरीता**

**(विशेष सूचना :- प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर २०२६)**

प्रति,

**मा.प्राचार्य/ मान्यताप्राप्त परिसंस्थाचे मा.संचालक,**

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालये व परिसंस्था यांना..**

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यास पाठक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरीक्त तुकडया, सॅटेलाईट केंद्र यांचे प्रस्ताव आणि व्यावसायिक अभ्यासक्रम व खाजगी कौशल्य प्रदाता संस्था यांचे विस्ताराचे विद्यापीठाच्या ऑनलाईन प्रणालीमार्फत (OAASIS) प्रस्ताव सादर करणेबाबत..

**संदर्भ :-** ०१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ अन्वये.
०२) शासन निर्णय क्र. मान्यता-२०२५/ई-१३११९८७८/मशि-४, दि. १८ सप्टेंबर २०२५

महोदय/महोदया,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ आणि संदर्भिय शासन निर्णय नुसार संलग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये सुरु करावयाच्या नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरीक्त तुकडया इत्यांदिंसाठी विस्ताराचे प्रस्ताव/अर्ज मागविण्यात येत आहेत. उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयामध्ये तसेच नवीन मान्यतांसाठी आवश्यक निकषां संदर्भात शासनाकडून प्राप्त होणा-या आदेशांमध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दती व निकाषांनुसार आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ च्या तरतुदींनुसार शासनाच्या संकेतस्थळ https://htedu.maharashtra.gov.in/NCPS यावर सादर करुन विद्यापीठामार्फत योग्य ती कार्यवाही करुन पात्र प्रस्ताव विद्यापीठाच्या शिफारशींसह शासनाकडे मान्यतेसंदर्भात पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी त्याच संकेतस्थळावरुन अग्रेषित करण्यात येतील.

महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरुन विस्तारांचे प्रस्ताव सादर करतांना सर्व अकृषी विद्यापीठांकडे असलेल्या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. परंतु मा.विद्या परिषदेने पारित केलेला ठराव क्र. विपए-७१/२०२६, दि. १८/०८/२०२६ नुसार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडे सद्यस्थितीत सुरु असलेलेच अभ्यासक्रमांसाठी शासनाकडे विस्ताराचे प्रस्ताव सादर करावयाचे आहेत त्यासाठी विस्तार करावयाचा अभ्यासक्रम सुरु करण्यापूर्वी त्या महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी प्रस्ताव सादर करण्यापूर्वी विद्यापीठाकडून ना हरकत प्रमाणपत्र (NOC) घेणे आवश्यक आहे. जेणेकरुन अस्तित्वात नसलेले अभ्यासक्रमासाठी शिफारस करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

त्याचप्रमाणे ज्या महाविद्यालये/परिसंस्थामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम (PG) नाहीत, परंतु त्या महाविद्यालयांना NEP-२०२० अंतर्गत चतुर्थवर्षाकरीता Hon's आणि Research करीता अभ्यासक्रम सुरु करावयाचा असेल अशा महाविद्यालयांना विस्तारीकरणांतर्गत शासनाकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

विस्तारीकरणाच्या प्रस्तावा सोबत संलग्नता शुल्क भरणे आवश्यक आहे. करीता संलग्नता शुल्काबाबतचे परिपत्रक, संलग्नता शुल्काचा तक्ता आदि माहिती विद्यापीठ संकेतस्थळ www.nmu.ac.in आणि ऑनलाईन ॲफिलिएशन (OAASIS) मधील Downloads या Link वर उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना शासनाकडे सादर करावयाचे विस्तारांचे प्रस्तावांसाठी विद्यापीठाकडे संलग्नता शुल्क भरण्यासाठी **https://onlinekbcnmu.org.in** या संकेतस्थळामार्फत Link ची मागणी केल्यानंतर Link उपलब्ध करुन देण्यात येईल.

१) ज्या शैक्षणिक संस्थांना आणि ज्या कार्यरत महाविद्यालयांना, महाविद्यालयात सध्या सुरु असलेले विद्याशाखा / अभ्यासक्रम / विषय / तुकडी या व्यतिरिक्त नवीन विद्याशाखा, नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरीक्त तुकडया इत्यांदिंचा शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून **विस्तार** करावयाचा असेल, अशा महाविद्यालयांनी विस्तारासंदर्भातील शासनाच्या संकेतस्थळावर भरलेल्या अर्जाची हार्डकॉपी आणि त्या सोबत आवश्यक दस्तऐवज **०१ प्रत आवश्यक ते साक्षांकित केलेले कागदपत्र व संलग्नता शुल्क भरल्याची पावती** विद्यापीठाच्या संलग्नता विभागास दि.३०/०९/२०२६ पर्यत कार्यालयीन वेळेत सादर करावी. त्याचप्रमाणे एखाद्या महाविद्यालयास एकापेक्षा जास्त विस्तार करावयाचा असेल त्या महाविद्यालयाने शासनाच्या संकेतस्थळावर सादर केलेल्या सर्व अर्जांची छायांकित प्रत विस्तारीकरणाच्या प्रस्तावा सोबत जोडणे आवश्यक आहे.

(कृ.मा.प.)

***संलग्नीत महाविद्यालयांनी/मान्यताप्राप्त परिसंस्थांनी वरील विस्ताराचे अर्ज शासनाच्या संकेतस्थळावर सादर करतांना संदर्भिय शासन निर्णयात नमूद केलेल्या बाबींची पूर्तता करणे अनिवार्य असून, अपूर्ण भरलेले अर्ज, अपूर्ण कागदपत्र, साक्षांकित न केलेले कागदपत्र वा तत्सम बाबी आढळल्यास अशा अर्जावर विद्यापीठामार्फत कार्यवाही केली जाणार नाही, तसेच याबाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.***

२) ज्या संलग्नीत महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२७-२८ करीता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ मधील कलम १०९(८) नुसार शासनाकडून जलदगती पध्दतीने तुकडी मान्यता प्राप्त झाली असेल व त्यास विद्यापीठाचे संलग्नीकरण मान्य झाले असेल त्यांनी सदर तुकडीबाबत पुढील शैक्षणिक वर्षाकरीता नियमित अतिरीक्त तुकडीकरीता शासनाने विहीत केलेल्या निकष व कार्यपध्दती नुसार विद्यापीठाकडे नव्याने अर्ज सादर करुन नियमित अतिरिक्त तुकडीस शासन मान्यता घेणे आवश्यक आहे. अशा तुकडीस पुढील शैक्षणिक वर्षामध्ये नियमित अतिरिक्त तुकडी म्हणून शासन मान्यता प्राप्त न झाल्यास सदर तुकडीमध्ये प्रथम वर्षाकरीता विद्यार्थी प्रवेश करता येणार नाहीत. (तथापि, जलद गती पध्दतीमध्ये मान्यता दिलेली अतिरिक्त तुकडी नैसर्गिक विस्ताराने पुढे चालू राहील)

३) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी अतिरीक्त तुकडी मिळण्याकरीता सादर केलेल्या प्रस्तावामध्ये विद्यार्थी क्षमता नमूद करावी. अन्यथा कोणत्याही सबबीवर मंजूर विद्यार्थी संख्येपेक्षा वाढीव प्रवेश करण्यांस विद्यापीठामार्फत मान्यता दिली जाणार नसल्याने, आपणांस हव्या असलेल्या वर्गासाठी आपण शैक्षणिक वर्ष २०२७-२८ करिता विस्तारांतर्गत अतिरीक्त तुकडीकरिता प्रस्ताव सादर करावेत, अशी विनंती-वजा-आवाहन करण्यात येत आहे. तसेच याबाबत न्यायालयीन बाब उद्‌भवल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

४) विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व अनुदानित, विना अनुदानित आणि कायम विना अनुदानित महाविद्यालयांनी विस्ताराचा प्रस्ताव सादर करणेपूर्वी त्यांना लागू असलेले नॅक/एन.बी.ए. तसेच त्याचे पुनर्मुल्यांकन केलेले असणे आवश्यक तथा बंधनकारक राहील. तसेच संबंधीत महाविद्यालयांनी यु.जी.सी./शासन/विद्यापीठ यांचे अटी, शर्ती व निकष पूर्ण करणे बंधनकारक राहील.

५) व्यावसायिक अभ्यासक्रमासंदर्भात घेण्यात येणारे प्रस्ताव विद्यापीठाच्या https://onlinekbcnmu.org.in या संकेतस्थळावर Homepage वरील Affiliation Section मध्ये Proposal Guidelines २०२७-२८ येथे Click करावे. सदर Link मध्ये आवश्यक त्या सर्व सूचना देण्यात आलेल्या असून त्या सूचनेनुसार ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. आपल्या माहितीसाठी सदर ठिकाणी Contact us मध्ये Helpline क्रमांक देखील देण्यात आलेला आहे. तसेच शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, संलग्नता शुल्काचा तक्ता, प्रक्रिया शुल्काचे परिपत्रक व इतर सविस्तर माहिती आणि संबंधित परिपत्रके Important G.R/ Ciculars तसेच Other G.R/Circulars या Link वर उपलब्ध आहेत.

विद्यापीठ कायद्याप्रमाणे माहे सप्टेंबर मध्ये प्रस्ताव सादर करणे बंधनकारक आहे. तथापि, व्यावसायिक अभ्यासक्रमाशी निगडीत महाविद्यालया संदर्भात AICTE व Pharmacy Council of India Approval Process Handabook हे साधारणत: जानेवारी/फेब्रुवारी मध्ये त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द होत असल्यामुळे त्यानुसार जे अभ्यासक्रम (तसेच विलनीकरण, पदवीका महाविद्यालयामध्ये पदवी अभ्यासक्रम) सुरु करावयाचे असतील अशा महाविद्यालयांना देखील याबाबत प्रस्ताव शुल्कासह सादर करणे आवश्यक आहे. अथवा अभ्यासक्रम सुरु करणार असल्याचे प्रस्तावित असून, तसा प्रस्ताव AICTE/Pharmacy Council of India ला सादर करणार आहोत, अशा आशयाचे पत्र विद्यापीठाला देणे अनिवार्य राहील. विस्ताराकरीता महाविद्यलयांना ३० सप्टेंबर पर्यत प्रस्ताव सादर न केल्यास AICTE/Pharmacy Council of India इ. चे पोर्टल उशिराने कार्यान्वित झाल्यानंतर महाविद्यालयांना नविन अभ्यासकम सुरू करावयाचे असल्यास नियमित शुल्क भरून प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. संलग्नता शुल्क प्राप्त झाल्यानंतरच ना हरकत प्रमाणपत्र देणेबाबतची कार्यवाही विद्यापीठाकडून करण्यात येईल. त्यासाठी विद्यापीठाचे दि. २८/०६/२०२२ च्या परिपत्रकानुसार प्रती अभ्यासक्रम/विषय, तुकडी वाढ, विद्यार्थी संख्या वाढ इ. करीता रु. २०००/- ना हरकत प्रमाणपत्र शुल्क महाविद्यालयास विद्यापीठास अदा करणे बंधनकारक राहील.

०६) त्याचप्रमाणे व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रस्तावाला विलंब झाल्यास (प्राधिकरणाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केल्यास) संलग्नता शुल्काच्या पाच पट विलंब शुल्क आकारण्यात येईल .

(कृ.मा.प.)

तरी आपणास कळविण्यांत येते की, आपण आपले अर्ज ऑनलाईन प्रणालीमार्फत भरुण आवश्यक त्या कागदपत्रांसह अर्जाची हार्ड कॉपी (सदर परिपत्रकात नमूद केलेल्या प्रतीत) दिलेल्या वेळापत्रकानुसार किंवा असाधारण परिस्थितीत दि.३०/०९/२०२६ पावेतो संलग्नता व इतर लागू असलेल्या शुल्कासह विद्यापीठाच्या संलग्नता विभागात सादर करावी, ही विनंती. आपल्या महाविद्यालयाचा/मान्यताप्राप्त परिसंस्थेचा ऑनलाईन प्रणालीमार्फत परिपूर्ण भरलेला अर्ज/प्रस्ताव, आवश्यक त्या साक्षांकित केलेल्या कागदपत्रांसह व संलग्नता शुल्कासह वेळापत्रकातील दिनांकापूर्वी तयार असल्यास, आपण असे अर्ज/प्रस्ताव नमूद केलेल्या दिनांका पूर्वीसुध्दा सादर करु शकतात.

ऑनलाईन **प्रणालीव्दारे माहिती भरतांना आपणांस काही अडचणी असल्यास सदर अडचणींचे निराकरण करण्यासाठी वर नमूद केलेल्या support@onlinekbcnmu.org.in वर helpline भ्रमणध्वनी क्रमांक ०८८२८९९६६६८/६९ देण्यात आलेला असून आपण त्या ठिकाणी देण्यांत आलेल्या दूरध्वनी/मोबाईलवर संपर्क साधल्यास आपल्या अडचणींचे तात्काळ निराकरण केले जाईल.**

**(डॉ.विनोद प्र. पाटील)**
**कुलसचिव**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी**
**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव**

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी:-**
मा.वित्त व लेखाधिकारी, कबचौउमवि, जळगाव

**प्रत माहितीसाठी:-**
०१) मा.कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
०२) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
०३) मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
०४) संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि, जळगाव